मराठा समाज सेवा मंडळ संचलित,

# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स, सोलापूर.

## माहिती पत्रक २०२२-२०२३

ज्ञानदान हे पवित्र कार्य आहे. हे जाणून बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि त्यातून बहुजन समाजाने आपला विकास साधावा असे प्रयत्न आधुनिक काळात झालेले आहेत. परंतु सोलापूर सारख्या श्रमिक कामगाराच्या शहरामध्ये अठरा पगड जाती असल्याने या सर्व जाती जमातीपर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहोचविण्याचे कार्य मराठा समाज सेवा मंडळ करीत आहे. मराठा समाज सेवा मंडळाची स्थापना १९६० साली झाली. आजतागायत वर्षात प्राथमिक, माध्यमिक शाळा, तांत्रिक तसेच कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालय व पदव्युत्तर आणि संशोधन केंद्र निर्माण करुन लावलेले छोटेसे रोपटे आज वटवृक्ष बनलेले आहे.

१९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालय सुरु आहे. १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून वरिष्ठ महाविद्यालय संस्थेने सुरु करुन काबाड-कष्ट करणाऱ्या परंतु महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या शाखा सुरु केल्या आहेत. आज या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. १९९१-९२ शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात कला, वाणिज्य या शाखांची पदवीपर्यंतची शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे. २००५ पासून पदव्युत्तर विभागाची सुरुवात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे २०१० पासून वाणिज्य संशोधन केंद्र कार्यरत झाले आहे. तसेच आपल्या महविद्यालयास ISO-9001:2015 असे मानांकन प्राप्त झाले आहे.

### ⁕ महाविद्यालय प्रवेशासंबंधी माहिती -

या महाविद्यालयात खालील वर्गाच्या अध्यापनाची सोय आहे.

- बी.ए. भाग १,२,३,
- बी.कॉम भाग १,२,३
- एम.ए. भाग १-२ राज्यशास्त्र (Entire)
- एम.ए. भाग १ व २ इतिहास
- एम.कॉम भाग १ व २ (Entire)
- अकौंटींग अॅन्ड ऑडीटींग

अ) प्रवेश घेतेवेळी माहिती पत्रकातील छापील प्रवेश अर्जाचाच उपयोग करावा. अर्जासोबत त्या त्या वर्गासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे जोडावीत.

१) शाळा, महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखला व त्याच्या दोन झेरॉक्स प्रती

२) डी.एड. विद्यार्थ्यासाठी प्राचार्याचे नाहरकत प्रमाणपत्र (नो ऑब्जक्शन सर्टिफिकेट)

३) ज्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यापूर्वीचा वर्ग उत्तीर्ण झाल्याचे मुळ गुणपत्रक व दोन झेरॉक्स प्रती साक्षांकित

४) बी.ए. भाग-१ बी.कॉम भाग-१ व एम.ए. भाग-१ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज (इलिजीबिलीटी सर्टिफिकेट)

५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील अन्य महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी संस्थांतर प्रमाणपत्र, (ट्रान्सफर सर्टिफिकेट)

६) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाबाहेरील अन्य महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट)

ब) जे विषय या महाविद्यालयात शिकविले जातात त्यासाठीच प्रवेश दिला जाईल. **एकदा निवडलेले विषय कोणत्याही सबबीवर बदलता येणार नाहीत**.

क) बी.ए. भाग-१, बी.कॉम भाग-१ व एम.ए. भाग-१ या वर्गामधील विद्यार्थ्यांना दिलेला प्रवेश विद्यापीठाने फक्त पात्रता प्रमाणपत्र दिल्यानंतर निश्चित केला जाईल. पात्रता प्रमाणपत्र न मिळाल्यास त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द केला जाईल व त्याला विद्यापीठ परीक्षेला बसता येणार नाही.

ड) कला व वाणिज्य विद्याशाखेतील प्रवेश प्रथम प्राधान्याने (First Come-First Served basis) देण्यात येतील. हे प्रवेश विद्यापीठ व शासन स्थरावर निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे देण्यात येतील.

इ) बी.ए.भाग-१ बी.कॉम भाग-१ साठी विद्यापीठाची शारीरिक शिक्षणाची १० गुणांची परीक्षा आवश्यक असते.

# अभ्यासक्रम व विषय

## कला व वाणिज्य शाखा

### * बी.ए. भाग-१ (प्रथम सत्र /द्वितीय सत्र) First Sem / Second Sem.

पात्रता - १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान उत्तीर्ण किमान कौशल्य अभ्यासक्रम, डी.एड. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येईल. या वर्गाला सत्र पद्धती लागू आहे.

अभ्यासक्रम - या वर्गात एकूण सहा विषयांचा अभ्यास करावा लागेल.

Compulsory Subject - अनिवार्य विषय - १) इंग्रजी (English) २) मराठी (Marathi)

Optional Subject - ऐच्छिक विषय - ऐच्छिक विषयातून कोणतेही चार विषय निवडावेत, परंतु खालील समुह अ मधून कोणताही एक विषय आणि समुह ब मधून कोणतेही तीन विषय निवडावेत.

समुह अ १) इंग्रजी (English) २) मराठी (Marathi)

समुह ब १) अर्थशास्त्र (Eco.) २) इतिहास (History) ३) राज्यशास्त्र (Pol. Sci.) ४) समाजशास्त्र (Sociology)

### * बी.ए. भाग-२ (तृतीय सत्र / चतुर्थ सत्र)

प्रवेश - विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येतो.

अभ्यासक्रम - या वर्गात विद्यार्थ्यांना खालील सात पेपर्सचा अभ्यास करावा लागतो.

आवश्यक पेपर - इंग्रजी (English)

एच्छिक विषय - (एकूण चार पेपर) - बी.ए.भाग १ ला निवडलेल्या चार ऐच्छिक विषयापैकी कोणतेही दोन ऐच्छिक विषय निवडावयाचे आहेत. या विषयाचे प्रत्येकी दोन पेपर अभ्यासावयाचे आहेत.

आंतरविद्या शाखीय विषय (I.D.S.) (एक पेपर) निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयापैकी कोणतेही एका विषयाशी संलग्न असलेला कोणताही एक विषय निवडावयाचा आहे.

संलग्न विषयांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| आंतरविद्या शाखीय निवडावयाचा विषय (IDS) | | निवडलेले ऐच्छिक विषय |
|---|---|---|
| १) सहकार (Co-operation) | - | अर्थशास्त्र, इतिहास, Economics, History<br>राज्यशास्त्र, समाजशास्त्र Pol. Sci., Sociology |
| २) महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास<br>History of Social Reform in Maharashtra | - | इतिहास, मराठी, राज्यशास्त्र<br>समाजशास्त्र |
| ३) लोक प्रशासन Public Administration | - | अर्थशास्त्र, इतिहास,<br>राज्यशास्त्र, समाजशास्त्र |

याशिवाय पर्यावरण अभ्यास - प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

(Environmental Science - A Certificate Course to be completed)

## * बी.ए. भाग-३ (पाचवे सत्र / सहावे सत्र)

प्रवेश विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येतो.

अभ्यासक्रम

अनिवार्य विषय - इंग्रजी (English)

ऐच्छिक विषय - विद्यार्थ्यांना एका स्पेशल विषयाची निवड त्यांनी बी.ए. भाग-२ या परीक्षेसाठी घेतलेल्या दोन ऐच्छिक विषयातूनच करावी लागते व निवडलेल्या स्पेशल विषयाचे पाच पेपर असतात. या महाविद्यालयामध्ये खालील स्पेशल विषय शिकविण्याची सोय आहे.

१) इंग्रजी २) मराठी ३) अर्थशास्त्र ४) समाजशास्त्र ५) राज्यशास्त्र ६) इतिहास

1) English 2) Marathi 3) Economics 4) Sociology 5) Pol. Science History

## * वाणिज्य शाखा

### बी. कॉम भाग - १ (प्रथम सत्र / द्वितीय सत्र) First Sem / Second Sem.

प्रवेश - १२ वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येतो.

या वर्गाला सत्र पद्धती लागू आहे.

1) English (Business Communication)
2) Principles of Marketing
3) Insurance
4) Business Economics
5) Principles of Business Management
6) Financial Accounting

### बी. कॉम भाग - २ (तृतीय सत्र / चतुर्थ सत्र) Third Sem / Fourth Sem.

प्रवेश - विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल.

1) English (Business Communication)
2) Business Statistics
3) Corporate Accounting
4) Fundamentals of Entrepreneurship
5) Business Economics
6) Money & Financial System
7) Environmental Studies

### बी. कॉम भाग - ३ (पाचवे सत्र / सहावे सत्र) Fifth Sem / Sixth Sem.

प्रवेश - विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल.

1) Business Economics
2) Business Regulatory Frame Work
3) Modern Management Practice
4) Co-operative Development
5) Advanced Accountancy Paper - I
6) Advanced Accountancy Paper - II

## * पदव्युत्तर विभाग - Post Graduate Section

जून २००५ पासून पदव्युत्तर विभागाची सुरुवात केली आहे. या विभागात एम.ए. राज्यशास्त्र, एम. ए. इतिहास व एम. कॉम च्या शिक्षणाची सोय आहे. यामुळे दिवसा काम करुन पदव्युत्तर शिक्षण घेणे सहज शक्य होणार आहे.

**एम.ए. भाग -१ (राज्यशास्त्र, इतिहास) - M.A. Part-I (Pol. Sci., History (प्रथम सत्र / द्वितीय सत्र)**

पात्रता व प्रवेश – सोलापूर विद्यापीठ किंवा इतर मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येईल.

अभ्यासक्रम – या वर्गात एकूण चार पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. या वर्गाची सोलापूर विद्यापीठाची सत्र पद्धतीने परीक्षा होईल.

**एम. ए. भाग -२ (राज्यशास्त्र, इतिहास) (तृतीय सत्र/चतुर्थ सत्र)**

प्रवेश – विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश घेता येतो. या वर्गाला सत्र पद्धती लागू आहे.

अभ्यासक्रम – या वर्गात एकूण चार पेपर्सचा अभ्यास करावा लागतो.

एम. कॉम **(Adv. Accountancy Grade)**

प्रवेश पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ किंवा इतर मान्यताप्राप्त विद्यापीठाचा बी.कॉम. ची पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश मिळेल.

**M.Com. I - या वर्गात एकूण चार पेपर्सचा अभ्यास करावा लागेल. (प्रथम सत्र / द्वितीय सत्र)**

**M.Com. II या वर्गात एकूण चार पेपर्सचा अभ्यास करावा लागेल. (तृतीय सत्र / चतुर्थ सत्र)**

संशोधन केंद्र –

महाविद्यालयामध्ये वाणिज्य संशोधन केंद्र असून येथे एम.फिल व पीएच.डी. संशोधनाची सुविधा उपलब्ध आहे.

CGPA / CBCS पद्धती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाअंतर्गत CGPA आणि CBCS पद्धतीने ७० मार्कांची विद्यापीठ परीक्षा आणि ३० मार्काची अंतर्गत मूल्यमापून परीक्षा होईल. यामध्ये ३० मार्काची अंतर्गत परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

बी.ए.भाग–१, बी.कॉम भाग–१, एम.ए. भाग १ व २ आणि एम.कॉम भाग १ व २ या वर्गांना CBCS (Choice Based Credit System) लागू आहे.

## ❊ क्रीडा विभाग – Gymkhana Dept.

या विभागामार्फत विविध खेळांची व व्यायामाची सोय उपलब्ध आहे. क्रीडा विभागामार्फत दरवर्षी वार्षिक क्रिडा स्पर्धा घेतल्या जातात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यामधील खेळाडूवृत्ती जोपासून तिची वाढ करण्याच्या दृष्टीने आणि त्यांना विशिष्ठ खेळात प्राविण्य संपादन करता यावे म्हणून खास शारीरिक शिक्षकाकडून मार्गदर्शन केले जाते. देशी विदेशी खेळाची येथे सोय आहे. अनेक खेळात या कॉलेजच्या विद्यार्थ्यानी विद्यापीठ पातळीवर प्रतिनिधीत्व केले आहे. क्रिडांगण व सुसज्ञ क्रिडा साहित्य ही जिमखान्याची वैशिष्ट्ये आहेत.

पुण्यशोलक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शारीरिक शिक्षण सक्तीची केली आहे. बी.ए. व बी.कॉम भाग १ मधील विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणामध्ये भाग घ्यावाच लागतो. शिवाय विद्यापीठ सर्वच विद्यार्थ्याची १० गुणांची शारीरिक शिक्षणाची परीक्षा घेते ते गुण एकंदर गुणात आवश्यकतेनुसार मिळवले जातात. This Physical Education Exam is Compulsory.

## ✻ ग्रंथालय व अभ्यासिका – Library

विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होण्यासाठी परीक्षेत उत्तम यश मिळविण्यासाठी लागणाऱ्या उत्तमोत्तम जुन्या आणि आधुनिक मौलिक पुस्तकांनी सुसज्ज असे ग्रंथालय आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार हवी ती पुस्तके दिली जातात. विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी ग्रंथालयाला जोडून राष्ट्रीय पातळीवरील इंग्रजी, पुस्तके, हिंदी भाषातील विविध नियतकालिके दैनिक मासिके यांची विपुलता असलेले वाचनालय आहे. विद्यार्थ्यांना फावल्या वेळात अभ्यास करता यावा म्हणून ग्रंथ क्रमिक पुस्तकांनी मुक्त अशा अभ्यासिकेची खास सोय आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या N-List Online Journals ची सोय.

## ✻ राष्ट्रीय सेवा योजना – (NSS)

१९९५–९६ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवी विद्यार्थ्यांचे एक केंद्र कार्यरत आहे. विद्यार्थ्यात सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी म्हणून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना राबवली जाते. गतवर्षी १०० विद्यार्थ्यांनी या योजनेत भाग घेतला. समाज सेवेची सुवर्णसंधी विविध उपक्रमाची नियोजन, कार्यवाही, विद्यापीठ व राष्ट्रीय पातळीवरील शिबीरात सहभाग ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. कार्यक्रम अधिकारी म्हणून द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. कोर्सपूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला प्रोत्साहनपर १० गुण मिळतील.

## ✻ सांस्कृतिक उपक्रम – CULTURAL ACTIVITIES

महाविद्यालयात विविध मंडळे स्थापन झालेली असून त्यांच्यामार्फत व्याख्याने, चर्चासत्रे, वक्तृत्व स्पर्धा इ. विविध उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात. स्पंदन या भित्तीपत्रकातून विद्यार्थ्याच्या लेखन गुणाचे दर्शन घडविले जाते. दरवर्षी सांजवात या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात येते. आजपर्यंत महाविद्यालयानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवक महोत्सवात सहभाग व पारितोषिके संपादन केलेली आहेत. यापुढेही सोलापूर विद्यापीठ मध्यवर्ती युवक महोत्सवात सहभाग असेल.

## ✻ अभ्यास मंडळ – BOS

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अभ्यासाची आवड निर्माण व्हावी आणि त्या–त्या विषयाची, अभ्यासाची अनुशंगिक माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी वाणिज्य, राज्यशास्त्र, मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास या विषयांची अभ्यासमंडळे कार्यरत आहेत. या मंडळामार्फत वर्षभर विविध कार्यक्रम व उपक्रम पार पाडली जातात.

## ✻ आरोग्य केंद्र – HEALTH CENTRE

आठवड्यातून दोन वेळा महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींची डॉक्टरांकडून मोफत तपासणी करुन उपलब्धतेनुसार मोफत औषधे देण्याची व्यवस्था या केंद्रामार्फत केली आहे. त्याचप्रमाणे वर्षातून एक–दोन वेळा मोफत विशेष तपासणी शिबीर आयोजित करुन सर्व विद्यार्थ्यांची विशेषज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी केली जाते.

## ✻ तक्रार निवारण मंडळ – COLLEGE GRIEVANCE REDRESSAL COMMITTEE

या समितीद्वारे विद्यार्थ्याचे न्याय तक्रारींचे निरसन केले जाते.

## * माजी विद्यार्थी संघटना - ALUMNI ASSOCIATION

महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची एक माजी विद्यार्थी संघटना कार्यरत आहे. या संघटनेमार्फत माजी विद्यार्थीशी सुसंवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

## * निसर्ग मंडळ - NATURE CLUB

या मंडळामार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना निसर्गाची व निसर्गातील घटकांची ओळख आवड निर्माण व्हावी तसेच पर्यावरणाचे महत्व समजण्यासाठी पक्षी, प्राणी आदिंची ओळख होण्यासाठी आणि पर्यावरण संतुलनातील या घटकांचे महत्व टिकवून देण्यासाठी विविध उपक्रम व कार्यक्रम राबिविले जातात.

IQAC : अंतर्गत गुणवत्ता हमी समितीद्वारे महाविद्यालयाची गुणवत्ता राखली जाते.

## * शिष्यवृत्ती व सवलती - Scholarships and Concessions

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींना सरकारी धोरणानुसार सर्व प्रकारच्या सवलती मिळतील. शिवाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या सवलती शिष्यवृत्ती मिळतील. खेळाडू, गरीब बुध्दीमान व होतकरु अशा विद्यार्थ्यासाठी विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या ठेवण्यात आलेल्या आहेत.

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर EBC / Scholarship & Freeship फॉर्म मुदतीत भरणे आवश्यक आहे. **ते न भरल्यास सदर विद्यार्थ्यास संपूर्ण फी भरावी लागेल.**

## * विद्यार्थी सहाय्यक निधी - (SAF)

गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने या निधीची उभारणी करण्यात येते. या निधीतून अशा विद्यार्थ्यांना आर्थिक मदत दिली जाते.

## * अंतर्गत तक्रार निवारण समिती - Internal Complaint Committee

या महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या संदर्भात काही मदत लागल्यास समितीशी संपर्क साधावा.

## * रॅगिंग प्रतिबंधक समिती - Anti - Ragging Committee

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या महाविद्यालयाच्या रॅगिंग प्रतिबंधक समिती स्थापन करण्यात आली आहे. या महाविद्यालयामध्ये रॅगिंगला पूर्णपणे बंदी आहे. जर कोणी तसा प्रयत्न केला तर रॅगिंग विरोधी अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित विद्यार्थ्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

## * विशेष पारितोषिके - Special Prizes

आमच्या महाविद्यालयातून विद्यापीठाच्या परिक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येतात. हुशार, होतकरु, अभ्यासू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे हा या पारितोषिका मागील उद्देश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढते आणि महाविद्यालयाचा शैक्षणिक विकास होईल याबाबतची सविस्तर माहिती कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

## * स्पर्धा परीक्षे केंद्र - Competitive Exam Center

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसंबंधी मार्गदर्शन केले जाते.

## ✻ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये – Salient Features of College

प्राध्यापक वर्ग : आपल्या महाविद्यालयातील सर्व अध्यापकवर्ग अनुभवी, व्यासंगी, आपल्या विषयात पारंगत आहेत. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्या निवारण करण्यात सदैव तयार असतात.

## ✻ महाविद्यालयीन शिस्त – Discipline

महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या व महाविद्यालयाच्या नियमांची काटेकोरपणे पालन केले पाहिजे. शिस्तीसंबंधी सर्वसाधारण नियम खालीप्रमाणे

१) प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक आहे. किमान ७५ टक्के हजेरी भरल्याशिवाय विद्यार्थ्यास परीक्षेस बसता येणार नाही.

२) प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र (आयडेंटटी) असले पाहिजे व मागताक्षणी सादर केले पाहिजे.

३) महाविद्यालयात तसेच बाहेर ही विद्यार्थ्यांचे वर्तन शिस्तबद्ध असले पाहिजे.

४) नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा इतर विद्यार्थ्याप्रमाणे उपस्थिती व महाविद्यालयाचे नियम पालनाचे बंधन राहील.

५) महाविद्यालयाच्या शिस्तीत बाधा आणणाऱ्या विद्यार्थ्यावर कडक कारवाई केली जाईल.

६) पूर्व परवानगीशिवाय अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यास शासन करण्याचा प्राचार्यांना अधिकार आहे.

७) प्राचार्यानी वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचना व नियम नोटीस बोर्डावर लावण्यास येतील व त्या सूचना व नियमाचे पालन करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक आहे.

८) विद्यार्थ्यांनी कोणत्याही स्वरुपातील महाविद्यालयाची बातमी महाविद्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय देऊ नये.

९) विद्यार्थ्यांनी आपली दुचाकी वाहन ठरवून दिलेल्या ठिकाणीच ठेवावीत.

१०) फी माफीचे अर्ज व शिष्यवृत्तीचे अर्ज निर्धारित वेळेत सादर केली पाहिजेत. अन्यथा वरील सवलत त्यांना मिळणार नाही व संपूर्ण फी भरावी लागेल.

११) महाविद्यालयात मोबाईल वापरण्यास मनाई आहे.

१२) रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

टीप : वरील नियमा व्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबीचा निर्णय घेण्याचा अधिकार प्राचार्यांना असून त्यासंबंधी कोणतीही तक्रार चालणार नाही.

## ✻ माहिती अधिकार – RTI COMMITTEE

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार महाविद्यालयात माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

१) अपिलीय अधिकारी – डॉ. ए. एन. बारबोले २) माहिती अधिकारी – डी. के. चाबूकस्वार

महाविद्यालयाचे संकेत स्थळ – सहाय्यक माहिती अधिकारी – बी.व्ही. धंदुरे

## ✻ करिअर कट्टा

करिअर कट्टा अंतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रम घेतले जातात.

महाविद्यालयीन कार्यालयीन कामकाजाची वेळ : सोमवार ते शनिवार दु. ३ ते रात्री १०

**• अध्यापनाची वेळ •**

सोमवार ते शनिवार सायंकाळी ५ ते रात्री १०

# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, सोलापूर.

| अ.क्र. | अध्यापक/प्राध्यापकाचे नाव | महाविद्यालयामधील पदनाम |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. बारबोले अनिल नागनाथ | प्राचार्य |
| २ | डॉ. पवार मधुकर श्रीरंग | प्राध्यापक |
| ३ | प्रा. मदने देवेंद्र विठ्ठल | सहयोगी प्राध्यापक |
| ४ | डॉ. मित्रगोत्री अरुण गोविंदराव | सहयोगी प्राध्यापक |
| ५ | प्रा. नवगिरे नागनाथ शंकर | ग्रंथपाल |
| ६ | प्रा. गवळी संतोष शंकर | शा.शि. संचालक |
| ७ | प्रा. आदमाने देवेंद्र भिमराव | सहयोगी प्राध्यापक |
| ८ | डॉ. सोनकांबळे अरुण विठ्ठल | प्राध्यापक |
| ९ | डॉ. ओहळ अभिमन्यू गेना | प्राध्यापक |
| १० | प्रा. गायकवाड नागेश संभाजी | सहयोगी प्राध्यापक |
| ११ | डॉ. मोटे राणी रामराजा | सहाय्यक प्राध्यापक |
| १२ | डॉ. सुरवसे युवराज गुंडू | सहाय्यक प्राध्यापक |
| १३ | डॉ. किर्तीकर वाल्मिक भिमराव | सहाय्यक प्राध्यापक |

# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, सोलापूर.

## शिक्षकेतर सेवक वर्ग (Non Teaching Staff)

| अ.क्र. | शिक्षकेतर सेवकांचे नांव | शिक्षण |
|---|---|---|
| १) | श्री. चाबुकस्वार दौलप्पा कल्लप्पा | बी. कॉम |
| २) | श्री. घंदुरे भानुदास विश्वनाथ | बी.ए. (ऑनर्स) |
| ३) | श्री. ढेंगळे महेश विठ्ठल | एच्. एस्. सी. |
| ४) | श्री. जाधव शहाजी सुरेश | एम.ए., एल.टी.सी. |
| ५) | श्री. भोसले दत्ता निवृत्ती | बी.ए. |
| ६) | श्री. लोंढे केशव प्रल्हाद | बी.ए. |
| ७) | श्री. थिटे महादेव यादवराव | सातवी |
| ८) | श्री. अलकुंटे संतोष तम्मा | एच.एस्.सी., एल.टी.सी. |

मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर, संचलित,

# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स, सोलापूर.

(विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत भरुन द्यावयाची माहिती)

मा. प्राचार्य
**छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स,**
सोलापूर.

मी श्री. / कु. ____________________

आपल्या वरिष्ठ महाविद्यालयात ____________________ या वर्गात प्रवेश घेतलेला

असून आपल्या महाविद्यालयाचे सर्व नियम माझ्यावर बंधनकारक राहतील याची मला पूर्व कल्पना आहे. त्यासाठी मी पुढील माहिती देत आहे.

आडनांव नांव वडिलाचे/पतीचे नांव आईचे नांव

१) संपूर्ण नांव ____________________

२) वर्ग ____________________ रोल नंबर ____________________

३) मी, ____________________ या ठिकाणी नोकरीस आहे/नाही.

व माझा वार्षिक पगार इतका (पगार पत्रक जोडावे)

४) मी महाविद्यालयात दररोज नियमितपणे उपस्थित राहीन.

५) मी सतत ४ दिवसापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास माझे नांव महाविद्यालयातून कमी करण्यास माझी हरकत नाही.

६) मी माझे ओळखपत्र दररोज स्वतःजवळ ठेवेन आणि मागितल्यास तत्पर आपल्या निदर्शनास आणेन.

७) माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे घडल्यास माझे नाव हजेरी पटावरुन कमी केल्यास माझी कोणत्याही प्रकारची तक्रार असणार नाही.

८) वरिष्ठ महाविद्यालयाच्या नियमात वेळोवेळी होणारे बदल माझ्यावर अधिक बंधनकारक राहतील याची मला पूर्ण कल्पना आहे.

९) रॅगिंगला कायद्याने बंदी आहे माझ्याकडून रॅगिंग प्रतिबंधक कायद्याचा भंग झाल्यास सदर कायद्यातील तरतुदीनुसार माझ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते याची मला कल्पना आहे.

मरणोत्तर अवयव दान करण्याची माझी इच्छा आहे. / नाही.

१०) फोन नंबर ____________________ मोबाईल नंबर ____________________

आपला विश्वासू

सही ____________________

नाव – ____________________